तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/माध्य/३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७/6592
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 22 NOV 2017

प्रति
अध्यक्ष/सचिव,
श्री साई एज्युकेशन सोसायटी, देवगांव ता. हवेली जि. पुणे

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २० जुन २०१२.
३. शासन निर्णय एसएफएस-२०१७/प्र.क्र.७७०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. ०८/११/२०१७.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | श्री साई एज्युकेशन सोसायटी, देवगांव ता. हवेली जि. पुणे | माँ जगदंबा इंग्लिश मिडीयम स्कुल, माँ जगदंबा निवास, संत कृपा कार्यालयाच्या मागे देऊगांव, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्य मंडळ) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी) | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम** व शाळेचे **ठिकाण** इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी **शैक्षणिक वर्ष २०१६-१७** पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून **१८ (अठरा) महिन्यांच्या** आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप **रद्दबातल** ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं **अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असे दर्शविणारा फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. संस्थेने जमिनीबाबतचा ७/१२ चा अद्ययावत उतारा /खरेदी खत /नोंदीणीकृत बक्षिसपत्र किंवा जमीन भाडेकरारावर (लिज) असल्यास ३० वर्षे कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार, अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, विहित निकषाची व मुदतीची मुदतठेव व लगतच्या ३ वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल इ. ३ महिन्यात सादर करणे सादर करणे आवश्यक आहे.
१०. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
११. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C )** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C. )** मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
१२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना '***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***' म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करणे आवश्यक राहील.
१३. शासनाचे सद्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा.आ.ना.भोंडवे, अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.